## विनिमय क्रमांक ८/२०१९

# विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना

# Universtiy Students Responsibility Fund (USR)

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद विहित करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी, विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टामध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता समाजोपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दीष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे आणि;

ज्याअर्थी, विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास केवळ पुस्तकी वा बौध्दिक शिक्षणाने होवू शकणार नाही. किंबहूना, व्यक्तीमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुध्दी आणी आत्मा या सर्वांच्या संतुलनातून खऱ्या अर्थाने विकसित होतो. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुनच उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी तसेच समाजातील दानशूर व्यक्ती, कंपनी किंवा कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी यामधून जमा होणाऱ्या निधीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी अर्थसहाय्य व्हावे ही विविध उद्दीष्टे समोर ठेवून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांकरीता **(University Student Responsibility Fund)** "विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना" **(USR)** सुरु केल्याने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल आणि;

ज्याअर्थी, सदर योजना विद्यापीठाव्दारे कार्यान्वीत केल्यास विद्यापीठ शैक्षणिक विभागात प्रवेशित विद्यार्थ्यांना रोजगारांच्या उपलब्ध असलेल्या विविध संधी तसेच समाजामध्ये वावरतांना सक्षम नागरिक म्हणून जिवन जगतांना उपयोगी पडेल आणि;

ज्याअर्थी दिनांक २२.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(च) नुसार योजनेचे विनियम तयार करण्यास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाने गठित केलेल्या समितीने खालील प्रमाणे विनियम तयार केलेले आहेत. आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे, आणि;

ज्याअर्थी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये शिकणाऱ्या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा, संशोधन आणी इतर आवश्यक शैक्षणिक गरजेपोटी लागणारे अर्थसहाय्य पुरविणे असे उद्देश आहेत.

त्याअर्थी, व्यवस्थापन परीषद पुढील प्रमाणे विनियम विहित करतीलः

१. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात यईल.

२. **योजनेसाठी निधी संकलन :**

अ) विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी/संचालक यांचे मासिक वेतनातून कमीत कमी रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर) किंवा जास्तीत जास्त निधी संमतीपत्र देवून **विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी** या नावाने असलेल्या विद्यापीठ खाती जमा करता येईल. सदर निधी संकलन हे स्वखुशीने असल्यामुळे कुणावरही कोणत्याही परिस्थितीमध्ये निधी संकलन बंधनकारक करता येणार नाही.

ब) लाभार्थी विद्यार्थी भविष्यामध्ये किंवा नजिकच्या काळामध्ये त्याला योजनेत प्राप्त झालेली रक्कम/निधी किंवा त्यापेक्षा कमी व जास्त निधी सदर योजनेमध्ये जमा करु शकतो. सदर योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यास निधी जमा करणे कोणत्याही परिस्थितीत बंधनकारक राहणार नाही.

क) या योजनेमध्ये समाजातील दानशुर व्यक्ती, शैक्षणिक, सामाजिक संस्था तसेच औद्योगिक निगडीत कंपनीव्दारे निर्माण होणारा सामाजिक दायित्व निधी जमा करु शकतात.

ड) इतर स्त्रोतांव्दारे प्राप्त होणारा सामाजिक दायीत्व निधी जमा करता येईल.

३. **योजनेचे उपक्रमांकरीता आर्थीक सहाय्य**

अ) प्रवेश/परिक्षा शुल्क आणी इतर सहाय्य याकरीता देय राहील.

ब) परिक्षा कालावधीमध्ये लागणारे ग्रंथालयातील पुस्तके प्राप्त करण्याकरीता जमा करावयाची सुरक्षा रक्कम ही सुध्दा विद्यार्थ्यांना परत करण्याच्या अटीवर देय राहील.

क) या योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थी हा चर्चासत्र, गटचर्चा इत्यादींमध्ये संशोधन पत्रिका सादरीकरण अथवा कार्यशाळांमध्ये सहभाग याकरीता नोंदणी शुल्क, प्रवास व निवास खर्च याकरीता एकूण खर्च रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) पर्यंतच देय राहील.

ड) स्वामित्व अधिकार (Patent Registration Fees ) नोंदणी शुल्क देय राहील.

इ) राष्ट्रीय/आंतर राष्ट्रीय क्रीडा, सांस्कृतिक आणी संशोधन स्पर्धेत (अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, दिल्ली (AIU) यांचेव्दारे आयोजित होणाऱ्या स्पर्धा वगळून) सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यास नोंदणी शुल्क, प्रवास व निवास खर्च यावर होणाऱ्या एकूण एकत्रीत खर्चाच्या ५० टक्के किंवा अधिकतम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

**४. अंदाजपत्रकीय शिर्ष**

या योजनेंतर्गत निधी संकलन आणी योजनेतील उपक्रमाकरीता अर्थसहाय्य करण्याकरीता विद्यापीठाचे मुख्य अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे शिर्षनिहाय तरतूद करण्यात आलेली आहे.

| Receipt | | Payment | |
|---|---|---|---|
| **Sr.No** | **Head of Account** | **Sr.No** | **Head of Account** |
| | **University Student Responsibility Fund(USR)** | | **University Student Responsibility Fund (USR)** |
| 01. | Donation | i) | Admission/Examination Fees & Other Assistance |
| a) | University Teachers/Officer/Employees | ii) | Travelling Allowance for Seminar/ Workshop/Symposia(Paper Presentation/ Attendance) |
| b) | Company/Industry/Person | iii) | National/Inter National Sports, Cultural and Research Competitions/Events (Excluding AIU Competitions) |
| c) | Ex-Students/Regular Students | iv) | Patent Registration Fees |
| d) | Others | v) | Book Bank & Others |

**५. योजनेसाठी पात्रता :**

०१. विद्यार्थी हा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचा नियमित विद्यार्थी असावा.
०२. सदर निधी कोणत्याही प्रकारचे दंड भरण्यासाठी मंजुर करता येणार नाही.
०३. विद्यार्थ्याच्या पालकाचे किंवा संपुर्ण परिवाराचे वार्षिक उत्पन्न रुपये ६,००,०००/-(अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) पेक्षा जास्त नसावे. सदर पडताळणी प्रवेश घेतेवेळी दाखल केलेल्या कागदपत्रावरुनच करावी.
०४. ज्या कारणाकरीता निधी मंजूर करण्यात येत असेल त्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करुन निधी मंजूर करता येईल. योग्य पुराव्याअभावी अर्ज नाकारण्यात येईल.
०५. निधी मंजूर करतांना विभाग प्रमुखांची शिफारस, पालकांचे हमीपत्र व विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र विचारात घेवूनच मंजूर रक्कम संबंधितांना अदा करता येईल.

**६. अर्जाचा नमूना व सादर करण्याची प्रक्रीया**

सदर योजनेंतर्गत लाभ घेवू इच्छिणारे विद्यार्थी परिशिष्ट अ नुसार अर्ज संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावे विभाग प्रमुखामार्फत सादर करणे अनिवार्य राहील.

**७. आवश्यक कागदपत्रे**

०१. परिशिष्ट अ नुसार विहित मागणी अर्ज.
०२. प्रवेश घेतांना जोडलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची सत्यप्रत.
०३. विद्यार्थ्याचे (विद्यापीठाचे) ओळखपत्र
०४. विद्यार्थ्याचे आधारकार्डाची सत्यप्रत.
०५. अधिकोष खाते पुस्तिका सत्यप्रत.
०६. मागणी संदर्भात सक्षम व आवश्यक कागदपत्रे.

**८. विद्यार्थ्याने केलेल्या कार्याचा अहवाल**

या योजनेंतर्गत अर्थसहाय्य मंजूर तथा देय झालेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल विभागप्रमुखाने संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

**९. समिती व समितीची कार्ये**

१. या योजनेकरीता मा.कुलगुरु महोदयांव्दारे समिती सदस्य नामित करण्यात येवून खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ०१. | प्र.कुलगुरु | अध्यक्ष |
| ०२. | शैक्षणिक विभागातील एक विभाग प्रमुख | सदस्य |
| ०३. | शैक्षणिक विभागातील एक शिक्षक | सदस्य |
| ०४. | विद्यापीठ आस्थापनेतील एक अधिकारी/कर्मचारी | सदस्य |
| ०५. | विद्यापीठ विभाग विद्यार्थी परीषदेचा सभापती/सचिव | सदस्य |
| ०६. | प्रभारी अधिकारी, विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र | सदस्य |
| ०७. | संचालक, विद्यार्थी विकास | सचिव |
| | **निमंत्रित सदस्य** | |
| ०१. | संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण/ संचालक, राष्ट्रीय सेवा योजना/ संबंधित विषयातील एक तज्ञ | सदस्य |

२. उपरोक्तप्रमाणे गठित करण्यात आलेल्या समितीची सभा ही आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी आयोजित करण्यात येईल.

३. या योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांची छानणी संचालक, विद्यार्थी विकास यांचेस्तरावर करण्यात यावी व त्यानंतर सदर समितीकडून कार्योत्तर मान्यता प्रदान करुन घ्यावी.

४. योजना राबवितांना येणाऱ्या भविष्यातील अडचणी लक्षात घेता समितीने समिती सभेत केलेल्या शिफारसी विद्यार्थी विकास मंडळाने मान्यता दिल्यानंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेवून योजनेमध्ये वेळोवेळी बदल करता येईल.

**१०. निधीचा विनियोग :**

१. सदर निधी विनियोगासाठी मा.कुलगुरूं महोदयांनी गठित केलेल्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार निधी वाटप करण्यात येईल.

२. अपवादात्मक परिस्थीतीत संचालक, विद्यार्थी विकास यांनी या योजनेकरीता गरजु विद्यार्थ्यांचा प्राप्त होणारा अर्ज शैक्षणिक विभाग प्रमुखांच्या शिफारसीनुसार अर्जाची निकड लक्षात घेवून मा.प्र-कुलगुरु महोदयांची मंजुरी प्राप्त करुन संचालक, विद्यार्थी विकास यांचे अधिकोष खात्याचा धनादेश निर्गमित करतील. याकरीता संचालक, विद्यार्थी विकास हे उपलब्ध निधीतील अंदाजपत्रकीय व्यय अर्थशिर्षनिहाय अग्रीम घेतील.

३. सदर योजनेंतर्गत जमा होणाऱ्या एकूण निधीतील रक्कम वाटप करुन वर्ष अखेर शिल्लक रकमेबाबत गठित समितीव्दारे वेळोवेळी निर्णय घेवून निधीचा विनियोग करता येईल.

**११. हक्क व सर्वाधिकार**

१. "विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना" (USR) या अंतर्गत विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांकरीता सुरु करण्यात येत असलेल्या उपक्रमाला अर्थ सहाय्य करण्याचा व या योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने विद्यार्थी अर्थसहाय्य मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. समितीचे अध्यक्ष/मा.प्र-कुलगुरुंचा राहील.

२. या योजनेकरीता विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/संचालक व विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच समाजातील विविध घटकांकडून प्राप्त होणाऱ्या दान निधीतून सदर योजना कार्यान्वयीत करण्यात येत आहे. त्यामुळे उपलब्ध निधीच्या अनुषंगानेच गरजु, होतकरु विद्यार्थ्याचे दायीत्व स्विकारण्यास विद्यापीठ कटीबध्द आहे. उपलब्ध होणाऱ्या निधीतून एखाद्या विद्यार्थ्यास अर्थसहाय्य न झाल्यास तो त्याचा हक्क अथवा विद्यापीठास बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भातून विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारी तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.

*****

परिशिष्ट अ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास
## "विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना"(USR)
## सहाय्यता मागणी अर्ज

विद्याथी/विद्यार्थीनीचे विभागप्रमुखांद्वारे स्वाक्षांकित केलेले छायाचित्र येथे चिटकवावे

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव | |
| प्रवेशित विभागाचे नांव | |
| प्रवेशित अभ्यासक्रम व वर्ष | |
| मोबाईल क्रमांक | |
| ई मेल आय डी | |
| अधिकोषाचे नांव व शाखा | |
| अधिकोष खाते क्र. | |
| IFSC Code | |
| विद्यार्थ्याच्या पालकाचे/वडीलाचे नांव | |
| व्यवसाय / नोकरी | |
| आईचे नांव | |
| व्यवसाय / नोकरी | |
| पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| पालकाचे/वडीलाचे वार्षिक उत्पन्न | |
| परिवारातील सदस्य संख्या एकूण | पुरुष ........... स्त्री ............ मुले............. |
| विद्यार्थ्यांची शैक्षणिक जबाबदारी | वडील/आई किंवा अन्य |
| ज्या कारणासाठी आर्थिक मदत हवी ते कारण | |
| ज्या कारणासाठी आर्थिक मदत हवी ती रक्कम | |
| संबंधित आर्थिक मदत मागणी संदर्भात सक्षम कागदपत्राचा तपशिल<br>(आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडावी) | |

उपरोक्त माहिती खरी असून मला मंजुर झालेली/मागणी केलेली रक्कम शक्य झाल्यास अन्य विद्यार्थ्याला मदत होण्याचे दृष्टिने परत करण्याचा प्रयत्न करेल.

.........................................

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

### पालकाचे संमतीपत्र व विद्यार्थ्याचे हमीपत्र

मी,श्री/श्रीमती.................................................................... विनंती करतो की, माझा पाल्य नामे ............................................................................यानेे/हिने वरील नमुद शैक्षणिक कार्यासाठी मदत मागितली आहे. सदर कार्याकरीता मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेचा उपयोग नमूद कार्यासाठी करण्यात येणार आहे. सदर आर्थिक सहाय्य ज्या उद्देशांपूर्ती न केल्यास व तसे सिध्द झाल्यास मंजुर रक्कम मी विद्यापीठास परत करेल. करीता समंतीपत्र तथा हमीपत्र सादर करण्यात येत आहे.

पालकाची स्वाक्षरी　　　　　　　　विद्यार्थ्याची स्वाक्षरी

**शिक्षक/विभागप्रमुखाची शिफारस**

श्री/कु. ------------------------ ---- हे विद्यापीठातील ---------------------- या शैक्षणिक विभागामध्ये --------- या वर्गास प्रवेशित असून त्यांचा विद्यापीठ विद्यार्थी दायीत्व निधि योजनेंतर्गत अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामध्ये विद्यार्थ्याने नमूद केलेले कार्य बरोबर असून अर्थसहाय्य मंजूर करण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे.

शिक्षकाची स्वाक्षरी व संपूर्ण नांव विभागप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

**कार्यालयीन उपयोगाकरीता**

विद्यापीठ विद्यार्थी दायीत्व निधि (USR) योजनेंतर्गत विद्यार्थ्याचा अर्ज, पालकाचे संमती पत्र, विभाग प्रमुखांची शिफारस आणी सोबत जोडलेले सहपत्र दिनांक -------------------- रोजी संपन्न झालेल्या गठित करण्यात आलेल्या समिती सभेत पडताळणी करुन/अपवादात्मक परिस्थितीमध्ये संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे शिफारसीनुसार योजनेतील उपक्रमाकरीता रुपये é ........................................ (अक्षरी रुपये ...................................................................... ) मंजूर / नामंजूर करण्यात येत आहे.

मा.प्र-कुलगुरु संचालक, विद्यार्थी विकास

**पोच पावती**

विद्यापीठ विद्यार्थी दायीत्व निधि (USR) योजनेंतर्गत माझ्या मागणीनुसार योजनेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर झालेले अर्थसहाय्य रुपये ---------------------------- (अक्षरी रुपये -------------------- ---------------) धनादेश क्र.--------------- दिनांक ------------------ अन्वये प्राप्त झाले.

**विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

**विनिमय क्रमांक ९/२०१९**

## महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना
## College Student Responsibility Fund (CSR)

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि;

ज्याअर्थी, महाविद्यालयीन शिक्षणाच्या उद्दीष्टामध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता समाजोपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दीष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे आणि;

ज्याअर्थी, विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास केवळ पुस्तकी वा बौध्दिक शिक्षणाने होवू शकणार नाही. किंबहूना, व्यक्तीमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुध्दी आणी आत्मा या सर्वांच्या संतुलनातून खऱ्या अर्थाने विकसित होतो. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुनच उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शैक्षणिक विभाग प्रमुख तसेच समाजातील दानशूर व्यक्ती, कंपनी किंवा कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी यामधून जमा होणाऱ्या निधीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी अर्थसहाय्य व्हावे ही विविध उद्दीष्टे समोर ठेवून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता (College Student Responsibility Fund) "महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना" (CSR) सुरु केल्याने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल आणि;

ज्याअर्थी, सदर योजना महाविद्यालयाद्वारे कार्यान्वीत केल्यास महाविद्यालयाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना रोजगारांच्या उपलब्ध असलेल्या विविध संधी तसेच समाजामध्ये वावरतांना सक्षम नागरिक म्हणून जिवन जगतांना उपयोगी पडेल आणि;

ज्याअर्थी दिनांक २२.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(च) नुसार योजनेचे विनियम तयार करण्यास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाने गठित केलेल्या समितीने खालील प्रमाणे विनियम तयार केलेले आहेत. आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे, आणि;

ज्याअर्थी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये शिकणाऱ्या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा, संशोधन आणी इतर आवश्यक शैक्षणिक गरजेपोटी लागणारे अर्थसहाय्य पुरविणे असे उद्देश आहेत.

त्याअर्थी, व्यवस्थापन परीषद पुढील प्रमाणे विनियम विहित करतीलः

१. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात यईल.

२. **योजनेसाठी निधी संकलन :**

i) महाविद्यालयाचे शिक्षक, महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी व विभाग प्रमुख, यांचे मासिक वेतनातून कमीत कमी रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर) किंवा जास्तीत जास्त निधी संमतीपत्र देवून "महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधीö या नावाने असलेल्या महाविद्यालय खाती जमा करता येईल. सदर निधी संकलन हे स्वखुशीने असल्यामुळे कुणावरही कोणत्याही परिस्थितीमध्ये निधी संकलन बंधनकारक करता येणार नाही.

ii) लाभार्थी विद्यार्थी भविष्यामध्ये किंवा नजिकच्या काळामध्ये त्याला योजनेत प्राप्त झालेली रक्कम/निधी किंवा त्यापेक्षा कमी व जास्त निधी सदर योजनेमध्ये जमा करु शकतो. सदर योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यास निधी जमा करणे कोणत्याही परिस्थितीत बंधनकारक राहणार नाही.

iii) या योजनेमध्ये समाजातील दानशुर व्यक्ती, शैक्षणिक, सामाजिक संस्था तसेच औद्योगिक निगडीत कंपनीव्दारे निर्माण होणारा सामाजिक दायित्व निधी जमा करु शकतात.

iv) इतर स्त्रोतांव्दारे प्राप्त होणारा सामाजिक दायीत्व निधी जमा करता येईल.

**३. योजनेचे उपक्रमांकरीता आर्थीक सहाय्य**

i) प्रवेश/परिक्षा शुल्क आणी इतर सहाय्य याकरीता देय राहील.

ii) परिक्षा कालावधीमध्ये लागणारे ग्रंथालयातील पुस्तके प्राप्त करण्याकरीता जमा करावयाची सुरक्षा रक्कम ही सुध्दा विद्यार्थ्यांना परत करण्याच्या अटीवर देय राहील.

iii) या योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थी हा चर्चासत्र, गटचर्चा इत्यादींमध्ये संशोधन पत्रिका सादरीकरण अथवा कार्यशाळांमध्ये सहभाग याकरीता नोंदणी शुल्क, प्रवास व निवास खर्च याकरीता एकुण खर्च रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) पर्यंतच देय राहील.

iv) स्वामित्व अधिकार (Patent Registration Fees ) नोंदणी शुल्क देय राहील.

v) राष्ट्रीय/आंतर राष्ट्रीय क्रीडा, सांस्कृतिक आणी संशोधन स्पर्धेत (अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, दिल्ली (AIU) यांचेव्दारे आयोजित होणा-या स्पर्धा वगळून) सहभागी होणा-या विद्यार्थ्यास नोंदणी शुल्क, प्रवास व निवास खर्च यावर होणा-या एकुण एकत्रीत खर्चाच्या ५० टक्के किंवा अधिकतम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

vi) महाविद्यालय त्यांच्या स्तरावर गरजेप्रमाणे उपकमांकरीता नियमामध्ये बदल करू शकतील.

**४. अंदाजपत्रकीय शिर्ष**

i) या योजनेंतर्गत निधी संकलन आणी योजनेतील उपक्रमाकरीता अर्थसहाय्य करण्याकरीता महाविद्यालयाचे अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे शिर्षनिहाय तरतूद करण्यात यावी.

| **Receipt** | | **Payment** | |
|---|---|---|---|
| **Sr.No** | **Head of Account** | **Sr.No** | **Head of Account** |
| | **College Student Responsibility Fund(CSR)** | | **College Student Responsibility Fund (CSR)** |
| 01. | Donation | i) | Admission/Examination Fees & Other Assistance |
| a) | College Teachers/Non-teaching Employee | ii) | Travelling Allowance for Seminar/ Workshop/Symposia(Paper Presentation/ Attendance) |
| b) | Company/Industry/Person | iii) | National/Inter National Sports, Cultural and Research Competitions/Events (Excluding AIU Competitions) |
| c) | Ex-Students/Regular Students | iv) | Patent Registration Fees |
| d) | Others | v) | Book Bank & Others |

**५. योजनेसाठी पात्रता :**

i) विद्यार्थी हा महाविद्यालयाचा नियमित विद्यार्थी असावा.

ii) सदर निधी कोणत्याही प्रकारचे दंड भरण्यासाठी मंजुर करता येणार नाही.

iii) विद्यार्थ्याच्या पालकाचे किंवा संपुर्ण परिवाराचे वार्षिक उत्पन्न रुपये ६,००,०००/-(अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) पेक्षा जास्त नसावे. सदर पडताळणी प्रवेश घेतेवेळी दाखल केलेल्या कागदपत्रावरुनच करावी.

iv) ज्या कारणाकरीता निधी मंजूर करण्यात येत असेल त्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करुन निधी मंजूर करता येईल. योग्य पुराव्याअभावी अर्ज नाकारण्यात येईल.

v) निधी मंजूर करतांना विभाग प्रमुखांची शिफारस, पालकांचे हमीपत्र व विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र विचारात घेवूनच मंजूर रक्कम संबंधितांना अदा करता येईल.

**६. अर्जाचा नमूना व सादर करण्याची प्रक्रीया**

सदर योजनेंतर्गत लाभ घेवू इच्छिणारे विद्यार्थी परिशिष्ट अ नुसार अर्ज प्राचार्य/विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचे नावे विभाग प्रमुखामार्फत सादर करणे अनिवार्य राहील.

**७. आवश्यक कागदपत्रे**

i) परिशिष्ट अ नुसार विहित मागणी अर्ज.

ii) प्रवेश घेतांना जोडलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची सत्यप्रत.

iii) विद्यार्थ्याचे (महाविद्यालयाचे) ओळखपत्र

iv) विद्यार्थ्याचे आधारकार्डाची सत्यप्रत.

v) अधिकोष खाते पुस्तिका सत्यप्रत.

vi) मागणी संदर्भात सक्षम व आवश्यक कागदपत्रे.

**८. विद्यार्थ्याने केलेल्या कार्याचा अहवाल**

या योजनेंतर्गत अर्थसहाय्य मंजूर तथा देय झालेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल प्राचार्य/विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचे कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

**९. समिती व समितीची कार्ये**

i) योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांची छानणी करण्याकरीता मा.प्राचार्याव्दारे समिती सदस्य नामित करण्यात येवून खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ०१. | प्राचार्य | अध्यक्ष |
| ०२. | शैक्षणिक विभागातील एक विभाग प्रमुख | सदस्य |
| ०३. | शैक्षणिक विभागातील एक शिक्षक | सदस्य |
| ०४. | शिक्षकेत्तर कर्मचारी | सदस्य |
| ०५. | महाविद्यालय विद्यार्थी परीषदेचा सभापती/सचिव | सदस्य |
| ०६. | विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) | सचिव |
| | **निमंत्रित सदस्य** | |
| ०१. | संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण/ कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना/ संबंधित विषयातील एक तज्ञ | सदस्य |

ii) उपरोक्तप्रमाणे गठित करण्यात आलेल्या समितीची सभा ही आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी आयोजित करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये मंजुर करण्यात आलेले अर्ज समितीचे पुढील सभेमध्ये कार्योत्तर मान्यतेकरीता सादर करता येईल.

iii) योजना राबवितांना येणा-या भविष्यातील अडचणी लक्षात घेता समितीने समिती सभेत केलेल्या शिफारसी विद्यार्थी विकास कक्षाकडून मान्यता दिल्यानंतर महाविद्यालय विकास समितीची मान्यता घेवून योजनेमध्ये वेळोवेळी बदल करता येईल.

**१०. निधीचा विनियोग :**

i) सदर निधी विनियोगासाठी मा.प्राचार्यांनी गठित केलेल्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार निधी वाटप करण्यात येईल.

ii) अपवादात्मक परिस्थीतीत विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांनी या योजनेकरीता गरजु विद्यार्थ्यांचा प्राप्त होणारा अर्ज शैक्षणिक विभाग प्रमुखांच्या शिफारसीनुसार अर्जाची निकड लक्षात घेवून मा.प्राचार्य महोदयांची मंजुरी प्राप्त करुन खात्याचा धनादेश निर्गमित करतील.

iii) सदर योजनेंतर्गत जमा होणा-या एकूण निधीतील रक्कम वाटप करुन वर्ष अखेर शिल्लक रकमेबाबत गठित समितीव्दारे वेळोवेळी निर्णय घेवून निधीचा विनियोग करता येईल.

**११. हक्क व सर्वाधिकार**

i) "महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना" (CSR) या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता सुरु करण्यात येत असलेल्या उपक्रमाला अर्थ सहाय्य करण्याचा व या योजनेंतर्गत प्राप्त होणा-या निधीच्या अनुषंगाने विद्यार्थी अर्थसहाय्य मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. समितीचे अध्यक्ष/मा.प्राचार्य यांना राहील.

ii) या योजनेकरीता महाविद्यालयाचे विभाग प्रमुख, शिक्षक व महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच समाजातील विविध घटकांकडून प्राप्त होणा-या दान निधीतून सदर योजना कार्यान्वयीत करण्यात येत आहे. त्यामुळे उपलब्ध निधीच्या अनुषंगानेच गरजु, होतकरु विद्यार्थ्याचे दायीत्व स्विकारण्यास महाविद्यालय कटीबध्द आहे. उपलब्ध होणा-या निधीतून एखाद्या विद्यार्थ्यास अर्थसहाय्य न झाल्यास तो त्याचा हक्क अथवा महाविद्यालयास बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भातून विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारी तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.

परिशिष्ट अ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास
## College Student Responsibility Fund (CSR)
## महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना
## सहाय्यता मागणी अर्ज

विद्यार्थी/विद्यार्थीनीचे विभागप्रमुखांद्वारे स्वाक्षांकित केलेले छायाचित्र येथे चिटकवावे

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव | |
| प्रवेशित विभागाचे नांव | |
| प्रवेशित अभ्यासक्रम व वर्ष | |
| मोबाईल क्रमांक | |
| ई मेल आय डी | |
| अधिकोषाचे नांव व शाखा | |
| अधिकोष खाते क्र. | |
| IFSC Code | |
| विद्यार्थ्याच्या पालकाचे/वडीलाचे नांव | |
| व्यवसाय / नोकरी | |
| आईचे नांव | |
| व्यवसाय / नोकरी | |
| पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| पालकाचे/वडीलाचे वार्षिक उत्पन्न | |
| परिवारातील सदस्य संख्या एकूण | पुरुष ........... स्त्री ............ मुले............. |
| विद्यार्थ्यांची शैक्षणिक जबाबदारी | वडील/आई किंवा अन्य |
| ज्या कारणासाठी आर्थिक मदत हवी ते कारण | |
| ज्या कारणासाठी आर्थिक मदत हवी ती रक्कम | |
| संबंधित आर्थिक मदत मागणी संदर्भात सक्षम कागदपत्राचा तपशिल (आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडावी) | |

उपरोक्त माहिती खरी असून मला मंजुर झालेली/मागणी केलेली रक्कम शक्य झाल्यास अन्य विद्यार्थ्याला मदत होण्याचे दृष्टिने परत करण्याचा प्रयत्न करेल.

.........................................

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

### पालकाचे संमतीपत्र व विद्यार्थ्याचे हमीपत्र

मी,श्री/श्रीमती..................................................................... विनंती करतो की, माझा पाल्य नामे ...........................................................................याने/हिने वरील नमुद शैक्षणिक कार्यासाठी मदत मागितली आहे. सदर कार्याकरीता मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेचा उपयोग नमूद कार्यासाठी करण्यात येणार आहे. सदर आर्थिक सहाय्य ज्या उद्देशांपूर्ती न केल्यास व तसे सिध्द झाल्यास मंजुर रक्कम मी महाविद्यालयास परत करेल. करीता समतीपत्र तथा हमीपत्र सादर करण्यात येत आहे.

पालकाची स्वाक्षरी

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

**शिक्षक/विभागप्रमुखाची शिफारस**

श्री/कु. ------------------------- ---- हे महाविद्यालयातील ----------------- या वर्गास प्रवेशित असून त्यांचा महाविद्यालय विद्यार्थी दायीत्व निधि योजनेंतर्गत अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामध्ये विद्यार्थ्याने नमूद केलेले कार्य बरोबर असून अर्थसहाय्य मंजूर करण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे.

विभागप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

शिक्षकाची स्वाक्षरी व संपूर्ण नांव

**कार्यालयीन उपयोगाकरीता**

महाविद्यालय विद्यार्थी दायीत्व निधि (CSR) योजनेंतर्गत विद्यार्थ्याचा अर्ज, पालकाचे संमती पत्र, विभाग प्रमुखांची शिफारस आणी सोबत जोडलेले सहपत्र दिनांक --------------------- रोजी संपन्न झालेल्या गठित करण्यात आलेल्या समिती सभेत पडताळणी करुन/अपवादात्मक परिस्थितीमध्ये विद्यार्थी विकास अधिकारी (SDO) यांचे शिफारसीनुसार योजनेतील उपक्रमाकरीता रुपये é ........................................... (अक्षरी रुपये ........................................................................ ) मंजूर / नामंजूर करण्यात येत आहे.

प्राचार्य

विद्यार्थी विकास अधिकारी

**पोच पावती**

महाविद्यालय विद्यार्थी दायीत्व निधि (CSR) योजनेंतर्गत माझ्या मागणीनुसार योजनेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर झालेले अर्थसहाय्य रुपये -------------------- (अक्षरी रुपये ----------------------------------------) धनादेश क्र.----------------- दिनांक -------------------- अन्वये प्राप्त झाले.

**विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास
## College Student Responsibility Fund (CSR)
## महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना

## अनुमती पत्र

मी,श्री/श्रीमती/कु.......................................................................................................
(महाविद्यालयाचे नांव)....................................................................(पद).................................या पदावर ............................................ या विभागात कार्यरत आहे.

"महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना"(CSR) करीता स्वेच्छेने माझ्या मासिक वेतनातून रु............. कपात करुन घेण्यास आपणांस अनुमती प्रदान करीत आहो.

आपला/आपली,

स्थळ :

दिनांक

........................

(नाव व पदनाम)

# विनियम क्रमांक १०/२०१९

## संत गाडगे बाबा सायकल योजना

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(३६) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निरोगी वातावरण, समूह जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृध्दीसाठी व्यवस्था करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी, विद्यापीठाचा परिसर ४८० एकर क्षेत्रामध्ये व्यापलेला असून त्यामध्ये शैक्षणिक विभाग, प्रशासकीय कार्यालये स्थापित करण्यात आले आहे व त्यामध्ये विद्यार्थ्यांना ये व जा करावे लागते व त्यासाठी त्यांना लांब प्रवास करावा लागतो आणि;

ज्याअर्थी, विद्यापीठ परिसरामधील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यापीठामध्ये कामानिमित्य आलेले व्यक्ती यांचेकरीता संत गाडगे बाबा सायकल योजना राबविण्याबाबत दिनांक ०७.१२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेमध्ये विषय क्र.३३ मधील प्रस्ताव क्र.२ नुसार सदर योजना राबविण्यात यावी असे ठरविण्यात आले आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१) मधील (द) नुसार विनियम प्रारुपास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस सादर करण्याकरीता सर्वाधिकार अधिष्ठाता मंडळास बहाल करण्यात आले आणि;

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विनियमावली तयार करण्यात आली असून विद्यार्थी विकास मंडळ सभा दिनांक ०२.०७.२०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ०७ नुसार प्रारुप विनियमावलीस मान्यता प्रदान करण्यात आली आणि;

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्यासाठी इच्छूक असलेले दानदाते यांना आवाहन करुन त्यांचेकडून प्राप्त झालेल्या देणगीतून सायकल खरेदी करावयाची आहे व देखरेखींवर खर्च करावा लागेल आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे, आणि;

ज्याअर्थी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये शिकणा-या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा, संशोधन आणी इतर आवश्यक शैक्षणिक गरजेपोटी लागणारे अर्थसहाय्य पुरविणे असे उद्देश आहेत.

त्याअर्थी, व्यवस्थापन परीषद पुढील प्रमाणे विनियम विहित करतील :

१. सदर विनियम ñसंत गाडगे बाबा सायकल योजनाò विनियम ï २०१९ असे संबोधण्यात येईल.

२. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात यईल.

३. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व तसेच बाहेरगावच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी यांना कामाचे निमित्ताने प्रवास करणे सोईचे होण्यासाठी तसेच विद्यापीठाचे पर्यावरण संवर्धनास व प्रदुषण रोखण्यास हातभार लावण्यासाठी ही योजना अंमलात आणण्यात येत आहे.

४. **लाभार्थी -**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व प्रशासकिय कामासाठी येणारे विद्यार्थी, बाहेरुन आलेले विद्यार्थी, कर्मचारी हे या सायकल योजनेचे लाभ घेवू शकतात.

५. विद्यापीठाच्या मुलांचे वसतीगृह, मुलींचे वसतीगृह, विद्यापीठाचे प्रवेशद्वार व प्रशासकिय इमारत येथे सायकली ठेवण्यात येतील.

६. मुलींचे वसतीगृह व मुलांचे वसतीगृहामधील विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना त्यांचे कामाकरीता (विद्यापीठ परिसर किंवा शैक्षणिक कामाकरीता) विद्यापीठाच्या परिसराबाहेर सायकली नेता येईल. सायकल नेतांना विद्यापीठाचे मुख्य प्रवेशव्दाराजवळ असलेले सुरक्षा रक्षक यांचे कार्यालयात असलेल्या रजिस्टरमध्ये नोंद करणे अनिवार्य राहील.

७. सदर विद्यार्थी हा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये शिकत असावा.

८. विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार व प्रशासकिय कार्यालय येथे उपलब्ध असलेल्या सायकली ह्या विद्यापीठाच्या कामानिमित्त बाहेरुन आलेल्या विद्यार्थी, पालक व इतर कर्मचारी यांना फक्त विद्यापीठाच्या परिसरामध्येच घेवून जाता येईल. सायकल विद्यापीठाच्या परिसरामध्येच कामानिमित्त नेण्यासाठी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळील सुरक्षा रक्षक यांचे कार्यलायत असलेल्या नोंदवहीत (सिक्युरीटी गार्ड जवळील रजिस्टरमध्ये) नोंद करणे व सोबतच एक ओळखपत्र जमा करणे अनिवार्य राहील. ओळखपत्रामध्ये १) विद्यार्थी ओळखपत्र (महाविद्यालयाचे), २) निवडणूक ओळखपत्र, ३)पॅन कार्ड, ४) वाहन चालकाचे प्रमाणपत्र, ५) पासपोर्ट, ६) कर्मचारी ओळखपत्र (फोटो प्रमाणपत्र सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले), ७) बँकेचे पासबुक (पासबुकवर फोटो प्रमाणित केलेला असावा), ८) आधार कार्ड, ९) इतर ओळखपत्र जे सक्षम अधिका-यांनी प्रमाणित केलेले.

९. सायकलीचे नुकसान किंवा मोड-तोड किंवा इतर मोडतोड झाल्यास त्याचा खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात येईल. तसेच सायकल चोरी झाल्यास सायकलची मूळ किंमत संबंधिताकडून वसुल करण्यात येईल. सायकलचे झालेले नुकसान विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळील सुरक्षा रक्षक (सिक्युरिटी गार्ड) अंदाजित खर्च म्हणून वसुल करेल. तत्पुर्वी विद्यार्थी विकास विभागाच्या संचालकांना माहिती देण्यात येईल. सायकलचे झालेले नुकसानाची भरपाई संबंधिताने करण्यास नकार दिल्यास अथवा केली नसल्यास संबंधितांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. विद्यापीठ शैक्षणिक विभाग विद्यार्थ्यांव्यतिरिक्त संबंधितांवर पोलिस प्रशासनाव्दारे कार्यवाही करण्यात येईल.

१०. विद्यार्थी विकास विभागाकडे सायकल योजनेमधील राखीव निधितून दर तिन महिन्यांनी देखभाल दुरुस्ती करण्यात येईल.

११. सायकलींचे सुटे भाग खराब होणे व ती दुरुस्ती करुन घेणे ही कामे विद्यार्थी विकास विभागाकडे राहील.

१२. या योजनेचे नियम व अटी आवश्यक्तेप्रमाणे बदल करण्याचा अधिकार विद्यार्थी विकास मंडळाच्या अनुमतीने मा.कुलगुरूचे स्वाधीन असेल.

१३. भविष्यामध्ये सायकली खरेदी करण्यासाठी दानदाते किंवा कंपनीचा दायित्व निधी प्राप्त झाल्यास व त्याला व्यवस्थापन परिषदेची मान्यता झाल्यानंतर सदर विनियमानुसार योजना राबविण्यात येईल.

१४. सायकल खरेदी प्रक्रीया ही विद्यापीठ नियमानुसार क्रय समितीव्दारे करण्यात येईल.

१५. सायकल खरेदी करीत असतांना विद्यार्थी, विद्यार्थीनी, कर्मचारी व विद्यापीठात कामांकरीता येणा-यांकरीता वेगवेगळ्या रंगाच्या सायकली खरेदी करण्यात येतील.

*****